# पालक सभेसंदर्भात शिक्षकांसाठी सूचना

- सभेचे आयोजन अशा ठिकाणी करा जिथे प्रोजेक्टर / स्मार्ट टीव्ही / स्पीकर्स उपलब्ध असतील, जेणेकरून व्हिडिओ आणि स्लाईड्स व्यवस्थित दाखवता येतील.
- सभा सुरू होण्यापूर्वी प्रोजेक्टर, माइक, इ. संसाधने सुरू आहेत याची खात्री करा, तर कृपया प्रत्येक स्लाईडसाठी दिलेल्या सविस्तर स्पीकर नोट्स वाचून पालकांना माहिती देण्यासाठी तयारी करा.
- ज्या पालकांकडे स्मार्टफोन नाहीत, त्यांना खात्री द्या की त्यांच्या मुलांना शाळेत सरावासाठी अतिरिक्त वेळ मिळेल. कोणत्याही प्रकारची न्यूनतेची भावना निर्माण होऊ नये यासाठी संवेदनशील राहा
- सभेची तारीख आणि वेळ पालकांना त्यांच्या मुलांमार्फत किमान २-३ दिवस आधी कळवा.
- विद्यार्थ्यांना पालकांना सभेची आठवण करून देण्यासाठी प्रोत्साहित करा.
- प्रत्यक्ष मार्गदर्शनासाठी, पालकांना त्यांचे स्मार्टफोन उपलब्ध असल्यास, सभेमध्ये सोबत आणण्याची विनंती करा.
- सभेच्या शेवटी, विद्यार्थ्यांचा लॉगिन आयडी आणि पासवर्ड पालकांना द्या आणि तो सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व समजावून सांगा.
- पालक सभा (PTM) आयोजित करण्याचा तुमचा अनुभव तुमच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर विशिष्ट फोटो आणि माहिती पाठवून सहकाऱ्यांसोबत शेअर करा. यामुळे आपल्याला एकत्रितपणे शिकण्यास आणि आपल्या पद्धती सुधारण्यास मदत होईल.

Confidential – Do not share without permission from Khan Academy

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

# डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम

## माता पालक सभा - मार्गदर्शिका: गृहपाठासाठी खान अकॅडमी प्लॅटफॉर्मचा वापर

शैक्षणिक वर्ष २०२६-२७

कार्यक्रमासाठी सहकार्य

cognizant foundation india

Shell India Markets Private Limited

# अजेंडा

1. डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान समृद्धी कार्यक्रमचा परिचय
2. खान अकॅडमी काय आहे?
3. खान अकॅडमी प्लॅटफॉर्म का वापरावा?
4. खान अकॅडमी प्लॅटफॉर्म कसा वापरावा?
5. पालकांची भूमिका
6. संसाधने



Confidential – Do not share without permission from Khan Academy

# डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम

महाराष्ट्र शासनाने गणित आणि विज्ञान विषयाची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून जुलै, २०२५ मध्ये खान अकॅडमी इंडिया सोबत सामंजस्य करार केला आहे

इयत्ता व विषय :
गणित (१ ली ते १० वी) + विज्ञान (६ वी ते १० वी)

इयत्ता ७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठीचे गणित विषयासाठी ई-साहित्य लवकरच उपलब्ध होईल.


लोकमत

## मुलांचे गणित अन् विज्ञान होणार पक्के

### जि.प शाळांसाठी उपक्रम, खान अकादमीसोबत करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गणित आणि विज्ञान विषयातील प्रत्येक विद्यार्थ्याचे पायाभूत ज्ञान दृढ करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्य शासनामार्फत 'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम' राबविण्यात येणार आहे. त्यासाठी खान अकादमीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कुतूहल यांचा वारसा विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारे प्रख्यात वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांच्या सन्मानार्थ हा उपक्रम राबविला जात असून सुमारे ५० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल.

या कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यातील सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी खान अकादमीची जागतिक दर्जाची आणि राज्य अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञानविषयक शैक्षणिक सामग्री (डिजिटल कंटेंट) अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. यातील व्हिडीओ वापरून शिक्षक अध्यापन अधिक समृद्ध करू शकतील तसेच विद्यार्थ्यांना व्हिडीओ-आधारित धडे आणि सराव प्रश्नांच्या माध्यमातून शाळेत व घरी संकल्पनात्मक आकलन दृढ करण्याची संधी मिळेल.

### शिष्यवृत्ती परीक्षांसाठीही अभ्यासक्रम उपलब्ध

राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मराठी व इंग्रजी भाषेत शिष्यवृत्ती अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आला आहे. यासाठी शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अध्यापन सहायक 'Khanmigo' मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यामध्ये विद्यार्थ्यांनी केलेला वापर, अध्ययनात घालवलेला वेळ व अध्ययन निष्पत्ती यांची माहिती मिळेल.

"

या उपक्रमाद्वारे भौगोलिक व साधनसंपत्तीच्या अडचणी दूर करून, लाखो विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, कुतूहल आणि महत्त्वाकांक्षा यासह शिकण्याची संधी उपलब्ध होईल.

**देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

Mumbai Main
Page No. 8 Oct 13, 2025
Powered by: erelego.com

# आपल्या पाल्यांकडून आपण खान अकॅडमी प्लॅटफॉर्म बद्दल काय ऐकले आहे??

# विद्यार्थ्यांचे अनुभव

# विद्यार्थ्यांना खान अकॅडमी प्लॅटफॉर्म का आवडतो!



पीएम श्री शाळा, कामरगाव, वाशिम

# खान अकॅडमी काय आहे?


अशा जगाची कल्पना करा जिथे प्रत्येकजण कुठेही, काहीही विनामूल्य शिकू शकतो.
Khan Academy


**खान अकॅडमी चे ध्येय म्हणजे कोणालाही, कोठेही विनामूल्य, जागतिक दर्जाचे शिक्षण देणे आहे.**



सलमान खान

पद्मश्री पुरस्कार प्राप्त | २०१६

संस्थापक आणि कार्यकारी संचालक



# खान अकॅडमी प्लॅटफॉर्म का वापरावा?


# १. सरावानेच परिपूर्णता येते! विद्यार्थ्यांच्या संकल्पना अधिक पक्क्या करण्यासाठी ४,००० हून अधिक प्रश्न आणि १२०० हून अधिक व्हिडिओ




खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वरील सामग्री राज्याच्या अभ्यासक्रमशी सुसंगत आहे आणि पूर्णपणे मोफत उपलब्ध आहे


शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना सराव प्रश्न, व्हिडिओ, क्विझ आणि चाचण्या नियुक्त करतील

शिक्षक काही विशिष्ट विद्यार्थ्यांना अधिक मदत करण्यासाठी घटक/धडा देखील निवडू शकतात.





Confidential – Do not share without permission from Khan Academy


# २. प्रत्येक विद्यार्थी शिकू शकतो - शिक्षकांनी दिलेला गृहपाठ विद्यार्थी स्वतःच्या गतीने पूर्ण करतात




लॉग इन केल्यावर, विद्यार्थ्यांना होम पेजवर शिक्षकांनी दिलेला गृहपाठ पाहता येतो





योग्य उत्तरांसाठी विद्यार्थ्यांचे कौतुक केले जाते





चुकीचे उत्तर असल्यास, विद्यार्थी सूचना आणि व्हिडिओची मदत घेतात.

# 3. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीची तात्काळ माहिती मिळते, यामुळे ते विद्यार्थांना त्यांच्या गरजेनुसार अधिक चांगली मदत करू शकतात




शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रगती अहवाल पाहू शकतात

विद्यार्थी **स्वतःची प्रगती** पाहू शकतात



# खान अकॅडमी प्लॅटफॉर्म कसा वापरावा?

# खान अकॅडमी प्लॅटफॉर्म कसा वापरावा?

## वर्गामध्ये



शिक्षक अभ्यासक्रमानुसार
वर्गात एखादा घटक
शिकवतात




शिक्षक विद्यार्थ्यांना
**मास्टरी ध्येय** निश्चित
करतात

## शाळेत सराव



+

## घरी सराव



## वर्ग (घटक) संपल्यानंतर



शिक्षक, प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांच्या
प्रगतीचा आढावा घेऊन आवश्यक
उपाययोजना आखतात

शिक्षक डेटाचा वापर करून विद्यार्थ्यांना पुढील मदत
कशी करावी हे ठरवतात

वेळापत्रकात प्रत्येक वर्गासाठी आठवड्यात किमान १ तास खान अकॅडमी सरावासाठी ठेवलेला आहे (उपलब्ध सुविधेनुसार: कॉम्प्युटर लॅब  किंवा वर्गात)

# खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर घरी सराव



# घरी खान अकॅडमी प्लॅटफॉर्म कसा वापरावा?
# पालकांची भूमिका


१. लॉग इन प्रक्रियाची माहिती आणि स्मार्टफोनचा पालकांच्या देखरेखीखाली वापर



२. मुलांना खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वर सराव करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे आणि लक्ष ठेवावे



३. शिक्षकांशी नियमित संवाद ठेवावा




# घरी खान अकॅडमी प्लॅटफॉर्म कसा वापरावा?
# पालकांची भूमिका

## १. लॉग इन प्रक्रियाची माहिती आणि स्मार्टफोनचा पालकांच्या देखरेखीखाली वापर

- शाळेकडून दिलेला विद्यार्थ्याचा युजरनेम आणि पासवर्ड घेऊन तो सुरक्षित जतन करा
- शक्य असल्यास, आठवड्यातून ३–४ दिवस (दरवेळी १५–२० मिनिटे) विद्यार्थ्यांना स्मार्टफोनवर खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वर सराव करण्याची संधी द्या






# घरी खान अकॅडमी प्लॅटफॉर्म कसा वापरावा?
# पालकांची भूमिका

## २. मुलांना खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वर सराव करण्यासाठी प्रोत्साहन द्या आणि लक्ष ठेवा



- मुलगा/मुलगी स्मार्टफोनवर सराव करत असताना त्यांच्यावर लक्ष ठेवा आणि त्यांना प्रोत्साहित करा. त्यांच्या प्रगतीबद्दल विचारपूस करा
- मुलगा/मुलगी मोबाइलचा वापर फक्त अभ्यासासाठी करत आहे याची खात्री करा
- फक्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठीच नसून, इतरांसाठी देखील प्लॅटफॉर्मवरील साहित्य मोफत उपलब्ध आहे.



# घरी खान अकॅडमी प्लॅटफॉर्म कसा वापरावा?
# पालकांची भूमिका

## ३. शिक्षकांशी नियमित संवाद ठेवा

- खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वापरताना काही अडचण आल्यास, शिक्षकांशी निःसंकोच पणे चर्चा करा
- जर तुमच्याकडे स्मार्टफोन नसेल, तर शिक्षकांना कळवा, जेणेकरून तुमच्या मुलाला/मुलीला शाळेत अतिरिक्त सरावाची संधी मिळेल



# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

**खान अकॅडमी प्लॅटफॉर्म साठी पैसे द्यावे लागतात का?**

**मोफत** - नाही, खान अकॅडमी प्लॅटफॉर्म पूर्णपणे मोफत आहे. वापरण्यासाठी कोणतेही शुल्क नाही

**सुरक्षित** - आम्ही कोणतीही वैयक्तिक माहिती विचारत नाही . विद्यार्थी फोन नंबर, ईमेल आयडी किंवा इतर खाजगी माहिती न देता सुरक्षितपणे लॉग इन करू शकतात

**मुलाला/मुलीला फोन/टॅबलेट कधी द्यावा?**

आपल्या सोयीप्रमाणे वेळ ठरवा, जसे की शाळेपूर्वी सकाळी, संध्याकाळी जेवणानंतर किंवा सुट्टीच्या दिवशी

आठवड्यात किमान २–३ वेळा, कमीत कमीत ३० मिनिटे सराव होईल याची खात्री करा

**मुलगा/मुलगी शिकण्याऐवजी गेम खेळत नाही याची खात्री कशी करावी?**

- आठवड्यातून किमान एकदा खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वर सरावाच्या वेळी त्यांच्यासोबत बसा
- त्यांना त्यांची प्रगती दाखवायला सांगा
- शिकणे का महत्त्वाचे आहे हे त्यांना समजावून सांगा.

**मला डिजिटल तंत्रज्ञानाचे ज्ञान नाही. मी माझ्या मुलाला/मुलीला कशी मदत करू शकेन?**

- त्यांची प्रशंसा करून त्यांना प्रोत्साहन द्या आणि वेळापत्रकानुसार सराव करण्याची आठवण करून द्या.
- त्यांनी काय शिकले याबद्दल विचारपूस करा
- प्लॅटफॉर्म कसा वापरायचा यासाठी शिक्षकांकडून प्रात्यक्षिक (डेमो) मागा

# आपल्या स्मार्टफोनवरील क्रोम ब्राउझरवर खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वापरण्याची प्रक्रिया





आपल्या फोनवरील क्रोम ब्राउझर उघडा, त्यात mr.khanacademy.org टाका आणि वर उजव्या बाजूच्या कोपऱ्यात क्लिक करा




वर डाव्या बाजूच्या कोपऱ्यातील लॉग इन बटणावर क्लिक करा




शिक्षकांनी दिलेला युजरनेम आणि पासवर्ड टाका




मास्टरी ध्येय वर क्लिक करा आणि आपला गृहपाठ पूर्ण करा

# कार्यक्रमाबाबत महाराष्ट्रातील वृत्तपत्रातील लेख

## शाळांमध्ये डॉ. नारळीकर अध्ययन समृद्धी कार्यक्रम

### खान ॲकॅडमीसोबत राज्य सरकारचा सामंजस्य करार

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

विद्यार्थ्यांच्या मनात गणित आणि विज्ञान विषयाची भीती असते. ही भीती कमी करण्याच्या उद्देशाने आणि विद्यार्थ्यांमध्ये या विषयावर आवड निर्माण करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्य सरकारने शाळांमध्ये डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी खान ॲकॅडमीसोबत सामंजस्य करार करण्यात आल्याची घोषणा रविवारी करण्यात आली. राज्यातील सुमारे ५० लाख विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

### 'विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल'



'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान शिक्षण वृद्धी कार्यक्रम' राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देत उच्च-गुणवत्तेची आणि जागतिक दर्जाची शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देईल. प्रत्येक विद्यार्थी, त्याच्या भौगोलिक स्थान व पार्श्वभूमीची पर्वा न करता, गणित आणि विज्ञान या भविष्योन्मुख विषयांमध्ये मजबूत पाया तयार करू शकेल. या उपक्रमाद्वारे भौगोलिक व साधनसंपत्तीच्या अडचणी दूर करून, लाखो विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, कुतूहल आणि महत्त्वाकांक्षा यांसह शिकण्याची संधी उपलब्ध होईल', असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

दिवंगत वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांच्या सन्मानार्थ हा उपक्रम राबविला जाणार असून या कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये राज्यातील सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी खान ॲकॅडमीची जागतिक दर्जाची आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञानविषयक शैक्षणिक सामग्री (डिजिटल कंटेंट) अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. ही शैक्षणिक सामग्री मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध असणार आहे. यातील व्हिडीओ वापरून शिक्षक वर्गामधील अध्यापन अधिक समृद्ध करू शकतील तसेच विद्यार्थ्यांना व्हिडीओ-आधारित धडे आणि सराव प्रश्नांच्या माध्यमातून शाळेत व घरच्या घरी संकल्पनात्मक आकलन दृढ करण्याची संधी मिळेल, असे सरकारने म्हटले आहे.

हा कार्यक्रम राज्य शिक्षण विभाग (शालेय शिक्षण आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली) आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यातर्फे राबविला जाणार आहे. याचे सनियंत्रण जिल्हा शिक्षण अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या देखरेखीखाली, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या साह्याने केले जाईल. यासाठी वास्तव-वेळेतील माहिती देणारा रिअल टाइम प्रोग्राम डॅशबोर्ड वापरला जाईल. यामध्ये विद्यार्थ्यांचा वापर, अध्ययनात घालवलेला वेळ व अध्ययन निष्पत्ती यांची माहिती मिळेल. यामुळे विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रगतीचे पारदर्शक पद्धतीने निरीक्षण करता येईल.

# तुमच्या पाल्याच्या शिक्षणाला साहाय्य करण्यासाठी पुढील पायऱ्या

## नियमित वेळापत्रक ठरवा

आठवड्यातील ठराविक दिवस आणि वेळ निश्चित करा, ज्यावेळी आपला मुलगा/मुलगी खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर सराव करेल. आठवड्यात किमान ३–४ दिवस, दरवेळी १५–२० मिनिटे सराव करण्याचे उद्दिष्ट ठेवा

आठवड्यात किमान ३० मिनिटे खान अकॅडमी प्लॅटफॉर्म गृहपाठासाठी वापरण्यास परवानगी द्या

डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम

# डॉ. जयंत नारळीकर गणित गुरुवार

दर गुरुवारी:
रात्री ८ ते १० च्या दरम्यान
३० मिनिटे करा गणिताचा सराव

डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम

# डॉ. जयंत नारळीकर सायन्स सोमवार

दर सोमवारी :
रात्री ८ ते १० च्या दरम्यान
३० मिनिटे करा विज्ञानाचा सराव

# आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!